


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

मंगळवार, दि. ०३ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०७४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# अजित पवारांचा मृत्यू संशयास्पद, चौकशी करा!

## भाजपच्या घोटाळ्याच्या फाइलचा उल्लेख करत संजय राऊतांची राज्यसभेत मागणी

**मुंबई/नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर झालेल्या चर्चा सत्रात शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा उपस्थित करत या विमान अपघाताची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच केंद्र सरकारवर जोरदार आरोप केले.

आज मला अजित पवारांची आठवण येत आहे. त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आम्ही सगळे अजूनही धक्क्यात आहोत, आम्हाला अजूनही कळत नाहीये की हे झाले कसे? अजित पवारांवर 70 हजार कोटींचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप सरकारने केला होता. पण ते भारतीय जनता



पक्षासोबत आले आणि पवित्र झाले, अशी टीका संजय राऊत यांनी केली.

पुढे संजय राऊत म्हणाले, 15 जानेवारी रोजी अजित पवारांनी एक वक्तव्य केले होते आणि भाजपला उद्देशून म्हटले होते की 'माझ्यावर सिंचन घोटाळ्याचा आरोप करत असाल तर त्यातला पैसा फक्त आम्हीच नाही खाल्ला, भाजपने सुद्धा या घोटाळ्यात पैसा खाल्ला आहे आणि त्यांची फाइल सुद्धा माझ्याकडे आहे'. हे त्यांनी 15 जानेवारी रोजी म्हटले होते आणि 10 दिवसांनी अजित पवारांचा विमान दुर्घटनेत मृत्यू झाला. मी आरोप करत नाहीये, पण हा मृत्यू संशयास्पद आहे.

संजय राऊत म्हणाले, अजित पवार हे नेहमी ती फाइल सोबत ठेवत होते. ते जेव्हा मुंबईहून निघाले होते, तेव्हा सुद्धा ती फाइल त्यांच्या सोबत होती. त्यानंतर अर्ध्या तासात त्यांचा मृत्यू होतो. याची चौकशी झाली पाहिजे. आता तर मला जस्टीस लोया यांची सुद्धा आठवण आली आहे. अजित पवारांचा मृत्यू पाहिल्यानंतर जस्टीस लोया यांची आठवण आली, असे म्हणत संजय राऊत यांनी सरकारला आरोप केले.

संजय राऊत यांनी संसदेत बोलताना सरकारवर देखील जोरदार आरोप केले. हे सरकार बेजबाबदार आहे. लोकशाही या देशात आता राहिलेली नाही. न्यायालय असो किंवा निवडणूक आयोग या सरकारी कंपन्या बनल्या आहेत. सोनम वांगचूक कुठे आहे? त्यांचा अपराध काय आहे? त्यांनी सांगितले होते की आमची जमीन चीनने घेतली, तर त्यांना राष्ट्रद्रोही ठरवत तुरुंगात टाकले. कुठे आहे लोकशाही? असा सवाल राऊत यांनी उपस्थित केला.

### हे सरकार भ्रष्टाचाराने व्यापलेली

पुढे बोलताना संजय राऊत यांनी 'मनरेगा'च्या मुद्द्यावरून टीका केली. मनरेगाचे नाव तर बदलले, पण रोजगार कुठून आणणार? शेतकऱ्यांना रोजगार मिळायचा, तो तुम्ही बंद केला. मराठवाड्यात 2025 साली 3 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. हे सरकार भ्रष्टाचाराने व्यापली आहे. देशभरातील भ्रष्टाचारी एकत्र आणतात आणि सरकार बनवतात, तोडतात. आधी नेत्यांना घडवले जायचे, आज नेत्यांना विकत घेतले जात असल्याचा आरोप राऊत यांनी केला.

## थोडक्यात...

### 3 आरोपींना जामीन मंजूर

पुणे (समर्थ गांवकरी) : पुण्यातील कल्याणीनगर येथे झालेल्या पोर्श कार अपघात प्रकरणात मोठी कायदेशीर घडामोड समोर आली आहे. अल्पवयीन आरोपीचे रक्ताचे नमुने बदलल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेल्या आदित्य सूद, आशिष मित्तल आणि अमर गायकवाड या तिघांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. सुमारे 18 महिन्यांपासून कारागृहात असलेल्या या आरोपींना यामुळे दिलासा मिळाला आहे. न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्जल भुयान यांच्या खंडपीठाने हा जामीन मंजूर केला. जामीन मिळालेल्यांमध्ये आदित्य अविनाश सूद (कारमध्ये मागे बसलेल्या मुलाचे वडील), आशिष सतीश मित्तल (मुख्य आरोपीच्या वडिलांचा मित्र) आणि अमर संतोष गायकवाड (रक्ताचे नमुने बदलण्यासाठी 3 लाख रुपयांची लाच घेणारा कथित मध्यस्थ) यांचा समावेश आहे.

### 25 हजार कोटींचा कुंभमेळा डीपीआरविना?

पुणे (समर्थ गांवकरी) : माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्यासाठी सुरु असलेल्या कामांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, 25 हजार कोटी रुपयांची कामे कोणताही सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) न करता सुरु आहेत. हा प्रश्न केवळ प्रशासकीय नसून कायदेशीर, नैतिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित असल्याचे विजय कुंभार यांनी म्हटले आहे. विजय कुंभार यांच्या माहितीनुसार, 2025 मध्ये लागू झालेल्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण अधिनियमानुसार, कुंभमेळ्यासाठी एकात्मिक 'कुंभ मेळा प्लॅन' तयार करणे बंधनकारक आहे. या आराखड्यात सर्व प्रकल्प, खर्च, खरेदी प्रक्रिया, अंमलबजावणीची रुपरेषा आणि वित्तीय नियोजन समाविष्ट असणे अपेक्षित आहे. मात्र, असा कोणताही एकात्मिक डीपीआर प्रत्यक्षात अस्तित्वात नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. माहिती अधिकार कायद्यांतर्गत कुंभार यांनी कुंभमेळा प्राधिकरणाकडे डीपीआरची मागणी केली होती. त्यांना वेळेत उत्तर मिळाले नाही. समाजमाध्यमांवर हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर मिळालेले उत्तर डीपीआर नसून, विविध विभागांमार्फत सुरु असलेल्या कामांची केवळ तुकड्या-तुकड्यांत दिलेली माहिती असल्याचे कुंभार यांनी म्हटले.

## पुणे शहरात अपघाती मृत्यू ४० टक्क्यांनी कमी करणार

- पोलिस आयुक्तांची घोषणा; दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

पुणे शहरात अपघाती मृत्यूचे प्रमाण ४० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट पुणे पोलिसांनी ठेवले आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी ही माहिती दिली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर, विशेषतः दारू पिऊन वाहन चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मागील वर्षी पुणे शहरात दारू पिऊन वाहन चालवल्याप्रकरणी सहा हजार जणांवर कारवाई करण्यात आली होती. ही मोहीम यापुढेही तीव्र करण्यात येणार आहे. शहरात कोणीही दारू पिऊन वाहन चालवणार नाही, हे सुनिश्चित करण्याचे पोलिसांचे लक्ष्य आहे. पुणे वाहतूक विभागातर्फे शिवाजीनगर मुख्यालयात आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान २०२६' समुपदेशन व मार्गदर्शन शिबिरात पोलीस आयुक्त अमितेश कुमार बोलत होते. यावेळी पूर्व प्रादेशिक विभागाचे अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील आणि वाहतूक पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव उपस्थित होते.

## अजित पवार-जयंत पाटलांमधील बैठकीचा तपशील समोर

### सुळे केंद्रात-पाटील राज्यात, रोहित पवारही मंत्रिमंडळात; अन् पक्षाची सूत्रे दादांकडे!

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत पडद्यामागे काय चर्चा झाली होती, याचे काही तपशील समोर आल्याने राजकीय वर्तुळात नव्याने खळबळ उडाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, विलीनीकरणानंतर एकत्रित पक्षाने महायुतीत सहभागी व्हावे, असा प्राथमिक आराखडा चर्चेत होता. या आराखड्यात केंद्रात सुप्रिया सुळे यांना मंत्रिपद आणि राज्य मंत्रिमंडळात शरद पवार गटातील एका नेत्याला स्थान देण्याचा प्रस्ताव मांडला गेला



होता. तसेच, एकत्र येणाऱ्या पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाबाबत अंतिम निर्णय शरद पवार घेतील, अशी रूपरेषा अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या बैठकीत चर्चिल्याचे सांगितले जाते. यातील मिळालेल्या माहितीनुसार सुप्रिया सुळे यांना केंद्रात मंत्रिपद तर जयंत पाटील यांना राज्यात मंत्रिपद देण्यात येणार होते. तर रोहित पवार यांनाही राज्यात राज्यात राज्यमंत्री पद देण्यात येणार होते. इतकेच नाही तर नवीन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पद हे खासदार अमोल कोल्हे यांच्याकडे सोपवण्यावर एकमत झाले होते. केंद्राची संपूर्ण जबाबदारी सुप्रिया सुळेंवर तर राज्यातील संपूर्ण जबाबदारी अजित पवारांकडे राहिल, असेही निश्चित झाले होते, अशी माहिती समोर आली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर या चर्चांना अधिक वेग आला. शरद पवार गटातील नेत्यांनी दोन्ही राष्ट्रवादींमध्ये विलिनीकरणाची अंतिम चर्चा झाल्याचा दावा केला. त्यासाठी जयंत पाटील यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीचा उल्लेख करण्यात येत आहे. या बैठकीत पुढील राजकीय दिशा ठरवण्याबाबत सविस्तर चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मुंबईतील जयंत पाटील यांच्या घरी 23 डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत शरद पवार गटातील सुमारे 14 नेते उपस्थित होते आणि अजित पवार यांच्यासोबत जवळपास अडीच तास चर्चा झाली, अशी माहिती समोर आली आहे.

## मुंढवा जमीन गैरव्यवहारात मोठी कारवाई

- 1886 पानी आरोपपत्रात शीतल तेजवानीच आरोपी; पार्थ पवार, दिग्विजय पाटील यांची नावे गायब, दमानियांचा संतप्त सवाल

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

पुण्यातील मुंढवा परिसरातील जमीन गैरव्यवहार प्रकरणात अखेर आरोपपत्र दाखल करण्यात आले असून या घडामोडीने प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. आर्थिक गुन्हे विभागाने न्यायालयात सादर केलेल्या



या दोषारोपपत्रात फक्त शीतल तेजवानी यांचे नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात आधी चर्चेत असलेली दिग्विजय पाटील आणि पार्थ पवार यांची नावे आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे या दोघांना या टप्प्यावर दिलासा मिळाल्याची चर्चा आहे. या जमीन गैरव्यवहार प्रकरणात पूर्वी पार्थ पवार यांच्यावरही आरोप करण्यात आले होते. मात्र, सादर करण्यात आलेल्या 1886 पानी विस्तृत चार्जशीटमध्ये त्यांचे नाव नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. दिग्विजय पाटील यांचाही उल्लेख आरोपपत्रात नाही. परिणामी, या दोघांविरोधातील तपासाची दिशा काय, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.






# तमाशा व वगनाट्याची जिवंत परंपरा जपणारे रघुवीर खेडकर यांना पद्मश्री

- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून पाबळ येथे गौरव!
- "तमाशा आणि वगनाट्याची जिवंत कला जपणारे, महाराष्ट्राचे भूषण रघुवीर खेडकर" – डॉ. विश्वासराव आरोटे

**पाबळ (पुणे) : (समर्थ गांवकरी)**





महाराष्ट्राच्या लोककलेच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद होईल अशी एक ऐतिहासिक घटना घडली असून, तमाशा व वगनाट्य या पारंपरिक लोककलेचे ज्येष्ठ, प्रयोगशील आणि लोकप्रिय कलावंत रघुवीर तुकाराम खेडकर यांना भारत सरकारकडून सन २०२६ चा प्रतिष्ठेचा 'पद्मश्री' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. तमाशा कलेसाठी मिळालेला हा पहिलाच पद्म पुरस्कार असल्याने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातील लोककला क्षेत्रात आनंद, अभिमान आणि गौरवाची लाट उसळली आहे. गेल्या पन्नास वर्षांहून अधिक काळ रघुवीर खेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य तमाशा कलेसाठी अर्पण केले आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या मातीत रुजलेली ही कला जिवंत ठेवण्यासाठी त्यांनी अखंड परिश्रम घेतले. गावोगावच्या फडांपासून ते राज्य, राष्ट्रीय आणि विविध सांस्कृतिक मंचांपर्यंत त्यांनी तब्बल १२ हजारांहून अधिक प्रयोग सादर केले. त्यांच्या सादरीकरणात केवळ मनोरंजन नाही, तर समाजजीवन, शेतकरी, कष्टकरी, स्त्रीजीवन, संघर्ष, विनोद आणि सामाजिक वास्तव यांचे प्रभावी दर्शन घडते.

तमाशा ही केवळ करमणुकीची कला नसून ती लोकजीवनाची नाडी आहे, हे खेडकर यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीतून सिद्ध करून दाखवले. त्यांच्या आवाजातील ताकद, अभिनयातील सहजता, संवादातील धार आणि वगनाट्यातील जिवंतपणा यामुळे लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वच रसिक त्यांच्या कलेवर प्रेम करतात. आजच्या आधुनिक मनोरंजनाच्या युगातही त्यांनी तमाशा ही जिवंत कला म्हणून टिकवून ठेवण्याचे मोठे काम केले आहे. खेडकर यांनी स्वतःच्या आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिले. आर्थिक अडचणी, कर्जबाजारी परिस्थिती असतानाही त्यांनी कधीही आपल्या कलाकारांशी तडजोड केली नाही. आपल्या फडासोबत दोनशे ते तीनशे कलाकार, वादक, तंत्रज्ञ आणि कामगारांना रोजंदारीचा आधार देत त्यांनी शेकडो कुटुंबांचा संसार चालवला. लोककलेच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करत समाजाला हातभार लावण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले.

याआधी त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य शासनाने त्यांना 'पठ्ठे बापूराव पुरस्कार' देऊन गौरवले होते. मात्र आता पद्मश्री पुरस्कारामुळे त्यांच्या योगदानाला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. हा सन्मान केवळ रघुवीर खेडकर यांचाच नसून, संपूर्ण तमाशा परंपरेचा, लोककलेचा आणि ग्रामीण संस्कृतीचा सन्मान मानला जात आहे.

या ऐतिहासिक सन्मानाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे जिल्ह्यातील पाबळ येथे रघुवीर खेडकर यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचा विशेष सत्कार केला.


या सत्काराच्या कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर, जेष्ठ पत्रकार दत्ता उनवणे, मळगंगा सहकारी पतसंस्थेचे सेवानिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीपराव वराळ, पत्रकार संघ विभागीय कार्यालय निघोज सल्लागार ॲड.गणेश लाळगे, अविनाश वराळ, गणेश खाडे, ज्येष्ठ नेते अनंतराव वरखडे, राजेश खोल्लम आदी. पत्रकार बांधव, कलाप्रेमी आणि स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, "तमाशा आणि वगनाट्याची जिवंत कला जपणारे, महाराष्ट्राचे भूषण आणि तमाशा पंढरीतील मानाचे नाव असलेले रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर होणे ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांनी ग्रामीण व शहरी भागात सर्वसामान्य रसिकांपर्यंत लोककला पोहोचवली. त्यांच्या कार्याची देशपातळीवर दखल घेण्यात आली, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे." रघुवीर खेडकर यांच्या कार्यक्रमांना मिळणारी शिस्तबद्ध, सुसंस्कृत आणि उत्स्फूर्त दाद हे त्यांच्या कलेचे मोठे वैशिष्ट्य आहे. आजपर्यंत त्यांच्या कोणत्याही कार्यक्रमाला गालबोट लागले नाही. त्यांच्या भगिनी मंदा राणी यांच्या गायनासाठीही रसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. हिरवळीवर बसून, कोणताही गोंधळ न करता, मनापासून कार्यक्रमाचा आनंद घेणारा रसिकवर्ग हीच तमाशा कलेची खरी ओळख असल्याचे चित्र त्यांच्या प्रत्येक प्रयोगातून दिसून येते. रघुवीर खेडकर यांना मिळालेला पद्मश्री पुरस्कार हा भविष्यातील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, लोककला जपण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी नव्या कलाकारांना दिशा देणारा आहे.

या महान लोककलावंताच्या कार्याला सलाम करत, पद्मश्री पुरस्काराबद्दल रघुवीर तुकाराम खेडकर यांचे सर्व स्तरातून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे.

## श्री विश्वकर्मा भगवान जयंती उत्साहात साजरी

- श्री विश्वकर्मा मंदिर हे भाविकांचे श्रद्धास्थान- सचिन जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



आठरे पाटील शाळेजवळील जयवंत नगर येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री विश्वकर्मा मंदिरामध्ये श्री विश्वकर्मा त्वष्टा पांचाळ समाजाच्या वतीने श्री विश्वकर्मा भगवान जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे. विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.०० वाजता श्री विश्वकर्मा भगवान पूजन, सकाळी १०.३०वाजता श्री सत्यनारायण महापूजा करण्यात आली.यानंतर जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप यांच्या हस्ते भगवान श्री विश्वकर्मा यांची महाआरती करण्यात आली.यावेळी नगरसेवक संपत बारस्कर,श्री विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त प्रा.माणिक विधाते, शिवा चव्हाण, सुनील नाळके, उमाकांत भोकरे,विजय गुंदेचा आदी उपस्थित होते. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.यावेळी श्री विश्वकर्मा त्वष्टा पांचाळ समाज बांधव व श्री विश्वकर्मा महिला मंडळ व ज्ञाती समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सचिन जगताप म्हणाले, भगवान श्री विश्वकर्मा हे शिल्प कलेचे निर्माते आहेत.श्री विश्वकर्मा मंदिर हे सर्व भाविकांचे श्रद्धास्थान आहे. भगवान श्री विश्वकर्माचे मंदिर निर्माण झाल्याने भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. संपत बारस्कर म्हणाले, आमदार संग्राम जगताप यांच्या सहकार्याने श्री विश्वकर्मा मंदिर निर्माण झाले आहे. भगवान श्री विश्वकर्मा हे सर्वांचे श्रध्दास्थान आहे.

## अभियानांतर्गत तरुणांना मार्गदर्शन

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

ओतुर पोलीस स्टेशनचे सहा पोलीस निरीक्षक लहु थाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी येथील विध्यार्थी यांची रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत मार्गदर्शन करताना वाहन चालवताना मोबाईलवर बोलु नये,विना लायसन्स वाहन न चालवणे,विना इन्शुरन्स वाहन न चालवणे, दारू पिऊन वाहन चालवु नये,विना हेल्मेट वाहन न चालवणे,विना सीट बेल्ट वाहन न चालवणे,तसेच नियमांचे काटेकोरपणे पालन करन्याबाबत सुचना दिल्या. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर लावले,वाहतूक चिन्हांचे व नियमांचे पालन करणे रस्ता ओलांडताना झेब्रा क्रॉसिंग चा वापर करणे तसेच वाहतुकीच्या नियमाबद्दल मार्गदर्शन केले तसेच वाहन चालक मालक यांची बैठक घेवुन त्यांना वाहतुक नियमा बाबत मार्गदर्शन केले.

## जुन्नर तालुक्यातील हजारो नेत्र रुग्णांना मिळाली नवी दृष्टी

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर ता:-जुन्नर, जि:-पुणे येथील गुरुवर्य कोंडाजी बाबा डेरे आश्रमामध्ये डिसेंट फाउंडेशन पुणे,शंकरा आय हॉस्पिटल पनवेल व विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया,आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.या शिबिराला परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.या शिबिरात एकूण १८४ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली, तर ४० रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले.

गेल्या दोन वर्षांत डिसेंट फाउंडेशनच्या माध्यमातून जुन्नर तालुक्यात पाच हजार मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा टप्पा पूर्ण झाला असून सर्व शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वीरीत्या पार पडल्या आहेत.

शिबिरात रुग्णांना तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, प्रवास,निवास,जेवण,चष्मा व एक महिन्यांची औषधे या सर्व सुविधा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. तसेच तिरळेपणावरील शस्त्रक्रिया देखील मोफत करण्यात येतात, अशी माहिती डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई यांनी दिली.

याप्रसंगी डिसेंट फाऊंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई,सचिव डॉ.एफ.बी.आतार,संचालक आदिनाथ चव्हाण,माऊली आय केअर चे विलास बोन्द्रे,गणेश मेहेर,सत्यवान खंडागळे,शंकर भिसे,छाया पाटील, ,प्रकाश नवले,सतीश शिंदे,शंकरा आय हॉस्पिटलचे समन्वयक ज्योती पाटील,तज्ञ डॉक्टर व त्यांची संपूर्ण टीम,विघ्नहर्ता मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल चे डॉ. अशितोष बोळीज,दयानंद गायकवाड व त्यांची सर्व टीम व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते शालेय साहित्य वाटप!

**पांजरे (ता. अकोले) : (समर्थ गांवकरी)**



आदर्श महिला विकास संस्था, मालदाड रोड संचलित नूतन माध्यमिक विद्यालय, पांजरे येथे ३० जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मा. डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे (महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ – राज्य सरचिटणीस तसेच समर्थ गांवकरी संपादक) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. डॉ. आरोटे यांनी विद्यालयास भेट देत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच संपूर्ण शाळेची पाहणी केली. संस्थेचे संस्थापक श्री. राघू जाधव (दादा) यांच्या आदिवासी व अतिदुर्गम भागातील शैक्षणिक कार्याचे त्यांनी तोंडभरून कौतुक केले. "या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी मी नेहमीच विद्यालयास भेट देऊन आवश्यक शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी सहकार्य करीन," असे आश्वासन त्यांनी आपल्या भाषणात दिले. यावेळी त्यांनी आपल्या बालपणातील अनुभवही विद्यार्थ्यांसमोर मांडले, ज्याला विद्यार्थ्यांनी भरभरून दाद दिली. या प्रसंगी विद्यार्थ्यांना वह्या व खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यालयातील वर्गखोल्यांना लादी बसवून देण्याचे आश्वासनही डॉ. आरोटे यांनी दिले. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. संजय उकिर्डे सर यांनी पाहुण्यांचा थोडक्यात परिचय करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शेळके सर यांनी केले. श्री. सोमनाथ हासे सर यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले, तर आभार प्रदर्शन श्री. वाळे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

## लाडक्या बहिणींची पुन्हा होणार ईकेवायसी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

लाडकी बहीण योजनेच्या लाखो लाभार्थ्यांचा लाभ बंद करण्यात आला आहे. ई केवायसी करुनही महिलांच्या खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे ई केवायसीत झालेली चूक. दरम्यान, लाखो महिलांना डिसेंबरचा हप्ता मिळाला नाही. यानंतर आता महिलांना पैसे मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. ई-केवायसी करुनही लाडकी बहीण योजनेचा लाभ बंद झाल्याच्या खूप तक्रारी समोर आल्या आहेत.

## उदापुरला सोमवार पासून हरिनामाचा जागर

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**




उदापूर (ता. जुन्नर) येथे संत शिरोमणी सावता महाराज व तुकाराम महाराजांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापनदिनाच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह,ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण,गाथा पारायण सोहळा सोमवार ता:-२ पासून सोमवार ता:-९ या कालावधीत आयोजित केला आहे. सोहळ्याचे हे ४९ वे वर्ष असल्याची माहिती ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष संजय शिंदे, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे,श्रीराम देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तुळशीराम शिंदे, सचिव बाळासाहेब होनराव, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बाजीराव कुलवडे,उपाध्यक्ष पांडुरंग बेळे व सरपंच सचिन आंबडेकर यांनी दिली. सप्ताह कालखंडात दिनक्रम पहाटे ६ ते ७ वाजता नगर प्रदक्षिणा, सकाळी ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ३ ते ५ गाथा पारायण, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ हरिकीर्तन त्यानंतर महाप्रसाद, हरिजागर आदी कार्यक्रम होणार आहेत या काळाच राजेंद्र सद्रगीर, ॲड. कृष्णा चवरे, नवनाथ लिमण, सुनील झांबरे, प्रशांत कोटकर, श्रावण अहिरे, सुनील मंगळापूरकर यांची कीर्तनरूपी सेवा होईल.तर डॉ. विकासानंद जी मिसाळ यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.

## मॉडेल स्कूल करडे येथे सीईओ पाटील यांची भेट

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

मॉडेल स्कूल जिल्हा परिषद शाळा करडे येथे मुख्यकार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी आपल्या संपूर्ण टिम सह भेट दिली. भेटी दरम्यान शाळेत चालू असलेल्या विविध विकासकामांची ; उपक्रमांची तसेच दैनंदिन कामकाजाची सखोल पाहणी केली .यावेळीवर्ग खोल्या वर्ग खोल्या डिजिटल शैक्षणिक साधने स्वच्छतागृहाची व्यवस्था पिण्याचे पाणी शालेय पोषण आहार खेळाचे मैदान परसबाग विद्यार्थ्यांची गुणवत्ता तसेच विविध उपक्रम मॉडेल स्कूलच्या माध्यमातून चाललेली विकास कामे यांची पाहणी केली समाधान व्यक्त केले . विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने गप्पा मारत त्यांच्या गुणवत्तेविषयी आवडीनिवडीविषयी भविष्यात काय होणार असे अनेक प्रश्न विचारून आत्मविश्वासाने दिलेल्या उत्तराबाबत विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे कौतुक केले शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेतील निकाल विविध स्पर्धा परीक्षा क्रीडा स्पर्धा निबंध स्पर्धायामध्ये विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश हे कौतुका स्पद आहे असे गौरव उद्गार सीईओ यांनी काढले. शाळेची पाहणी करत असताना प्रशस्त इमारत अखेर एक्यू मैदान शिक्षकांनी बांधलेली कमान शाळेच्या परिसरात असणारे झाडे स्वच्छ आवर हे विद्यार्थी शिक्षक पालक यांच्या समन्वयामुळे हे शक्य होतं. त्यामुळे शाळेची प्रगती होतेअशा भावना व्यक्त केल्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी गटविकास अधिकारी महेश डोकेकनिष्ठ उप अभियंता अतुल पिसाळ ग्रामसेवक बाळासाहेब बेंद्रेकारेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख सुतार शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्षसंतोष शितोळे शिक्षक नेते शिवाजीराव वाळके माजी ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब पळसकरजिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापिका सुलभा बांधल उपशिक्षक अशोक वाळके बाळकृष्ण पाचरणे संभाजी सातपुते उमेश उदमले व ग्रामस्थ उपस्थित होते .

# देशाचा चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न करा - डॉ. ओजस जोशी

## श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक, सांगळे गल्ली येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**




"शालेय जीवनात विद्यार्थ्यांची जडणघडण होत असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी शाळेबद्दल व गुरुजनांबद्दल नेहमी आत्मीयता बाळगावी, विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर कमीत कमी करावा, आई- वडिलांचा आदर करावा व शाळेपासूनच देशसेवेची सुरुवात करावी, देशाचा चांगला नागरिक होण्याचा प्रयत्न करावा," असे प्रतिपादन या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. ओजस जोशी यांनी केले.

श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक, सांगळे गल्ली येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सकाळी शाळेच्या प्रांगणात कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. ओजस जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. समवेत शालेय समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी , सदस्य सुनील जोशी , माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सुनील कानडे , प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री समर्थ विद्यामंदिर माध्यमिक विभागाचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना स्वदेशी व स्वच्छता या मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन केले. याच माध्यमातून खरी देशसेवा घडेल, असे त्यांनी सांगितले. "भारत मातेला मातृदेवो भव:" या उक्तीप्रमाणे मातृभूमीची सेवा करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्याध्यापक सुनील कानडे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. ध्वजारोहणापूर्वी संविधान वाचन करण्यात आले.

त्यानंतर ध्वजवंदन व राष्ट्रगीत घेण्यात आले. कार्यक्रमा दरम्यान देशभक्तीपर गीतांवर सामूहिक कवायत सादर करण्यात आली.सुत्रसंचालन सौ. शारदा होशिंग यांनी केले.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. श्रुती कुलकर्णी यांनी करून दिला, तर आभार श्रीमती नागरगोजे यांनी मानले.यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एम एच ३ गोदा-तरंगचा पदग्रहण सोहळा कृष्ण शोभा संपन्न



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

लिनेस सर्विस ऑर्गनायझेशन ऑल इंडिया लिमिट क्लब्स मल्टिपल चतुर्भुज अंतर्गत डिस्ट्रिक्ट एम एच ३ गोदा तरंग चा पदग्रहण कृष्ण शोभा अहिल्यानगर येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे अधिकारी पास्ट मल्टिपल प्रेसिडेंट डॉ वर्षा झंवर यांनी सर्वांचे स्वागत करुन सोहळ्याचे उद्घाटन केले व लिनेस संघटने बद्दलची माहिती दिली.

पदग्रहण अधिकारी पास्ट मल्टिपल प्रेसिडेंट लिनेस अंजली विसपुते यांनी उत्कृष्टपणे नवरत्नांच्या संकल्पनेने सर्व लिनेस कॅबिनेट व नवीन पदाधिकाऱ्यांना शपथ दिली. या पदग्रहण सोहळ्यासाठी २०२६ च्या नवनिर्वाचित मल्टिपल प्रेसिडेंट व प्रमुख अतिथी लिनेस अलका डोंगरे यांच्या हस्ते लिनेस निलम परदेशी यांना प्रांताध्यक्ष पदाची सूत्रे देण्यात आली. याप्रसंगी लिनेस अलका डोंगरे यांनी लिनेसची जगातील व्याप्ती व लिनेस तर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.महिलांनी आपल्या रोजच्या व्यापातून समाजसेवेसाठी वेळ द्यावा.असेही सुचवले. नवनिर्वाचित प्रांताध्यक्ष लिनेस निलम परदेशी यांनी यावर्षीची थीम "सेवा से स्वयं तेजस्वी भव:" घोषित केली.यावर्षी पाणी वाचवा,मुली वाचवा,महिला सक्षमीकरण,बाल व महिला विकास,निसर्ग संवर्धन व शैक्षणिक या मुख्य उद्दिष्टांवर काम करून समाजातील सर्व घटकांचा स्वयं विकासावर भर देणार आहे. डिस्ट्रिक्ट पीन व डिस्ट्रिक्ट डिरेक्टरी सफायरचे सर्व मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. प्रथमच दोन डिस्ट्रिक्ट उपक्रम राबविण्यात येणार आहे यामध्ये सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व दहावीच्या मुलांसाठी शैक्षणिक सॉफ्टवेअर अल्पदरामध्ये उपलब्ध करणार आहे.

यावेळी सचिव पदी-लिनेस शर्मिला कदम,खजिनदार पदी- लिनेस शोभा भालसिंग, पीआरओ पदी -लिनेस लाजरी जोशी,संपादक पदी-लिनेस अजिता एडके यांची नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला.

या पदग्रहण सोहळ्यात अहिल्यानगर, संगमनेर, श्रीरामपूर, शिर्डी, कोपरगाव, राहता, नाशिक,पुणे येथील लिनेस मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची प्रस्तावना लिनेस छाया रजपुत यांनी केली.पूर्व प्रांताध्यक्ष्य लिनेस लतिका पवार व उपाध्यक्ष लिनेस वर्षा गावते यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पदग्रहणाचे सूत्रसंचालन लिनेस लाजरी जोशी व आभार सचिव लिनेस शर्मिला कदम यांनी मानले.

# जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय कडूस व व्हा. चेअरमनपदी अर्जुन मंडलिक यांची निवड

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



अहिल्यानगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय सुदाम कडूस व व्हाईस चेअरमनपदी अर्जुन दिगंबर मंडलिक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या नूतन पदाधिकारी निवडीसाठी संचालक मंडळची सभा शनिवारी (दि.३१ जानेवारी) संस्थेच्या कार्यालयात जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अध्यासी अधिकारी किरण आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत चेअरमन पदासाठी संजय कडूस यांच्या नावाची सूचना संचालक प्रशांत मोरे यांनी मांडली. सदर सूचनेस कैलास डावरे यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमन पदासाठी अर्जुन मंडलिक यांच्या नावाची सूचना भाऊसाहेब चांदणे यांनी मांडली. सदर सूचनेस दिलीप डांगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याचे अध्यासी अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी नूतन चेअरमन संजय कडूस म्हणाले की जय श्री गणेश पॅनलने निवडणुकीच्या वेळी सभासदाना दिलेल्या आश्वासनाची १०० टक्के पूर्तता करण्याचे काम हे संचालक मंडळ करत आहे. संस्थेचे आर्थिक हित व सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून सहकारी संचालक व सभासदांच्या सहकार्याने विविध योजना राबविण्यात येतील. संस्थेचा लौकिक या पुढील काळात अधिक वाढविण्यासाठी सर्वांच्या सहकार्याने प्रयत्न केले जातील असेही ते म्हणाले. व्हा. चेअरमन अर्जुन मंडलिक यांनी सर्व सहकारी संचालकांचे आभार मानून सभासदांच्या हिताचे निर्णय घेवू असे सांगितले. सदर प्रसंगी संस्थेच्या मावळत्या चेअरमन सुरेखा महारनूर, मावळते व्हा.चेअरमन श्रीकांत देशमाने, संचालक विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, राजू दिघे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, ज्योती पवार, कल्याण मुटकुळे, सुधीर खेडकर, काशिनाथ नरोडे, योगेंद्र पालवे, मनिषा साळवे, अभिजित पवार, चेतन चव्हाण, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे, संस्थेचे सभासद सुजाता भांडवलकर व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

# नगर अर्बन बँक घोटाळ्याप्रकरणी तत्कालिन ५ संचालकांना नियमित जामीन मंजूर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




नगर अर्बन मल्टीस्टेट को.ऑप. बँकेतील घोटाळ्याप्रकरणी नगरच्या कोतवाली पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्याप्रकरणी बँकेच्या ५ तत्कालिन संचालकांना सर्वोच्च न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. यात शैलेश मुनोत, दिनेश कटारिया, राजेंद्र अग्रवाल, नवनीत सुरपुरिया, कमलेश गांधी यांचा समावेश आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे संबंधितांना मोठा दिलासा मिळाला आहे. याकामी ॲड. श्रेयस उदय ललित, ॲड. हिमांशु वत्स, ॲड. सुधांशु चौधरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी बाजू माडली व युक्तीवाद केला. सदर युक्तीवाद ग्राह्य धरून सर्वोच्च न्यालयाच्या न्यायमूर्ती बी. व्ही. नागरत्ना मॅडम यांनी नियमित जामीन मंजूर केला. नगर अर्बन बँकेतील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी पोलिसांत बँकेच्या तत्कालिन संचालकांसह काही अधिकारी, कर्जदारांवर गुन्हे दाखल झालेले आहे. आर्थिक गुन्हे शाखेमार्फत या गुन्ह्याचा तपास सुरू आहे. या प्रकरणात काही आरोपी न्यायालयीन कोठडीत असून काही आरोपींना अटकपूर्व जामीन मिळालेला आहे.

आरोपींपैकी शैलेश मुनोत, दिनेश कटारिया, राजेंद्र अग्रवाल, नवनीत सुरपुरिया, कमलेश गांधी यांचा समावेश यांनी नियमित जामीनासाठी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या याचिकेवर सुनावणी झाली.

यात आरोपींच्या वकिलांनी जोरदार युक्तीवाद करीत नियमित जामीनाची मागणी केली. हा युक्तीवाद ग्राह्य धरत सर्वोच्च न्यायालयाने सर्व ५ जणांना नियमित जामीन मंजूर केला.

# साईलता सामलेटी यांना पदी बढती

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत नेवासा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी यांची नुकतीच पदोन्नती शिक्षणाधिकारी प्राथमिक या पदावर झाली आहे . शासनाने नुकतेच तसे आदेश काढले आहेत. गटशिक्षणाधिकारी पदावर कामकाज करताना त्यांनी काम केलेल्या सर्वच तालुक्यात अत्यंत चांगले कामकाज केले आहे . अत्यंत कडक शिस्तीच्या अधिकारी म्हणून त्यांचा लौकिक आहे. ज्ञानरचनावादावर आधारीत अध्यापन, शिक्षकांना सोबत घेत कोव्हिड काळातील संगमनेर मधील कामकाज, शाळा स्तरावर राबवलेले विविध उपक्रम,मिशन आरंभ, मिशन आपुलकी यामध्ये त्यांनी उल्लेखनीय काम केले.

# मेहेराबादला अवतार मेहेरबाबाच्या ५७ व्या अमरतिथीची सांगता

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



३ दिवसाच्या नगर जवळील मेहेराबाद येथील समाधीस्थळी अवतार मेहेरबाबाच्या अमरतिथी उत्सवाची सांगता विविध भाषेतील प्रार्थनेने व आरतीने झाली.यावेळी हजारो भाविकानी जय मेहेरबाबा म्हणून एंकमेकांचा निरोप घेतला व ते आपल्या गावाकडे परतू लागले. नगर जवळील मेहेराबाद येथे अवतार मेहेरबाबाची समाधी आहे. याठिकाणी अमरतिथी उत्सवात ८० हजारच्या वर भाविक आले होते. ३ दिवस दिवसभर भारतातील विविध ठिकाणाहून लोंकानी भजने,बाबावरील सांस्कृतीक व नृत्याचा कार्यक्रम, नाटक, गजल, इ.कार्यक्रम सादर केले. आज दि.१ फेब्रुवारी रोजी गाणे, नृत्य, भजने झाली व दु.१ वाजता आरती,प्रार्थना झाली.चेअरमन फॉमरोज मिस्री यांनी सर्वांचे आभार मानून आपले मनोगत व्यक्त केले. माझा जन्मोस्तव सगळीकडे साजरा करा परंतु अमरतिथी फक्त मेहेराबादलाच साजरी करा असे मेहेरबाबांनी सांगून ठेवले होते. त्यांच्या हयातीतच टेकडीवर समाधीचे बांधकाम करण्यात आले होते. तर चार बाजूला चार धर्मांची मनोरे लावण्यात आले आहेत व सप्तरंगी ध्वज या ठिकाणी सतत फडकत आहे. जेणे करून सर्व धर्म एकच आहे हे प्रतीत व्हावे. या ठिकाणी वर्षभर जगातून व भारतातून विविध धर्माचे भाविक येत असतात व बाबांचे स्मरण करत असतात. या ठिकाणी मनाला शांती मिळते व प्रेमाचीच भाषा बोलली जाते. वाईट कोणी कोणाला बोलत नाही. सर्व वातावरण शांत व परिसर कायम स्वच्छ असतो. उत्सवा निमित्त भाविकांना राहण्यासाठी तात्पुरते तंबू ,स्वछतागृहे उभारण्यात आली होती. पिण्याचे पाणी,आरोग्य सुविधा तसेच महाप्रसादाचीहि सोय होती. टेकडीच्या पायथ्याशी अल्पदरात उपहारगृहे, प्रसादाची,फोटो व पुस्तकांची असंख्य दुकाने होती. या उत्सवाची वैशिष्ठे म्हणजे जवळपास सर्वच कामे हि भाविक स्वयंसेवक होऊन करतात.यामध्ये साऊड सिस्टीम,दर्शनरांग,प्रसाद वाटप,शौचालय व परिसराची साफसफाई, पिण्याचे पाणी, वाहतूक,नियोजन,संवक्षनाचे काम व नियोजन ते करतात. तीन दिवस हजारोंच्या संखेने लोक येऊनही कोठेही गडबड गोंधळ नव्हता.तीन दिवस येथे जनु काही सर्व धर्मीय जागतिक प्रेम संमेलन भरले होते. कारण विविध भाषिक गाणी,नृत्य,वाद्य,कला,पेहेराव,नाटिका पहावयास मिळाल्या. मेहेरबाबा ट्रस्टच्या वतीने भाविकासाठी अनेक सोई सुविधा पुरवण्यात आल्या .

# प्रेमाच्या बहाण्याने जाळ्यात ओढून निर्घृण लूट करणाऱ्या हनिट्रॅप टोळीचा पर्दाफाश

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

प्रेमाच्या बहाण्याने जाळ्यात ओढून निर्घृण लूट करणाऱ्या हनिट्रॅप टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) मोठा पर्दाफाश केला आहे. दोन तरुणींसह पाच जणांना अटक करण्यात आली असून चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या सराफालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या कारवाईत तब्बल २ लाख ८८ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गोड बोलणं, थेट बारदरीत सापळा प्रेमाचा बहाणा करत तरुणीने फोनवरून फिर्यादीला गाठले. तिच्या बोलण्याला भुलून फिर्यादी थेट बारदरी (गर्भगिरी फाटा) येथे भेटीसाठी पोहोचला. मात्र तिथे आधीच दबा धरून बसलेल्या आरोपींनी गळ्याला कोयता लावून सोने-चांदीचे दागिने व रोकड लुटली. बदनामीच्या भीतीने फिर्यादीने सुरुवातीला रस्ता लुटीची तक्रार दिली. मात्र, याच तक्रारीचा तपास करत असताना एलसीबीच्या पोलिसांना हा संपूर्ण हनिट्रॅपचा कट उघडकीस आला. गंभीर स्वरूपाचा गुन्हा लक्षात घेता, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाचे आदेश दिले. पोलिस निरीक्षक किरणकुमार कवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तपोवन रोड येथे सापळा रचून मुख्य आरोपी शुभम बडे याला अटक केली. चौकशीत त्याने दोन तरुणी व अन्य साथीदारांच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिली. अटक केलेले आरोपी शुभम शहादेव बडे (वाणीनगर, सावेडी),सोहेल पापाभाई सय्यद (देवटाकळी, शेवगाव),अशपाक नासिर पठाण (यशवंतनगर, भिंगार),वैष्णवी राजेंद्र उनवने (भगवान बाबा चौक, अहिल्यानगर),रुपाली गजानन बनकर (एमआयडीसी, अहिल्यानगर) चोरीचे दागिने खरेदी करणारा सराफ सुरज प्रदीप शहाणे (शास्त्रीनगर, केडगाव) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. चोरीचे दागिने सराफाकडे विक्री चौकशीत आरोपींनी लुटलेले दागिने सराफाला विकल्याचे उघड झाले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या सराफाने पोलिसी खाक्या दाखवताच मुद्देमाल काढून दिला. हनिट्रॅपद्वारे लूट केल्यानंतर आरोपी थेट गोवा ट्रिपला गेले. समुद्रकिनाऱ्यावर मौजमजा करून नगरमध्ये परतताच एलसीबीच्या पथकाने झडप घालून सर्वांच्या मुसक्या आवळल्या. सराईत गुन्हेगारांचा सहभाग मुख्य आरोपी शुभम बडे याच्यावर तोफखाना पोलिस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल आहेत. तर अशपाक पठाण याच्यावर भिंगार पोलिस ठाण्यात दोन गुन्हे नोंद आहेत. अनेकांना गंडवल्याचा संशय आरोपींनी यापूर्वीही पाच ते सहा जणांना अशाच पद्धतीने गंडवल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# अर्धापूरात कार अपघातात एक ठार चार जण गंभीर जखमी



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**


नांदेड-हदगाव मार्गे जात असतांना अर्धापूर शहराजवळ कारचा अपघात झाल्याची घटना घडली आहे. कार दुभाजकावर आदळली. या अपघातात विजय खंदारे (रा. साप्ती) यांचा मृत्यू झाला असून, अडीच महिन्यांच्या चिमुकल्यासह अन्य चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघात कशामुळे झाला आहे याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, कार क्रमांक ( एम.एच.२६ ए.के. ४९५६) ही कार नांदेडकडून हदगावकडे जात होती. अर्धापूर शहराजवळील एका मंगल कार्यालयासमोर ही कार जात असतांना कार जोरात दुभाजकाला जाऊन धडकली. या धडकेत विजय खंदारे (वय ४५, रा. साप्ती, ता. हदगाव) यांना गंभीर मुक्कामार लागल्याने त्यांचा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या अपघातामध्ये कारमधील अन्य चार प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये ऋतुजा श्रीकांत कांबळे (वय २४), रा. अर्धापूर, आरोही अतुल पंडीत (वय १०) रा. चैतन्यनगर, नांदेड, आदर्श विजय खंदारे (वय २२) रा. साप्ती ता.हादगाव आणि

एक अडीच महिन्यांचे बाळ असुन या बाळाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे समजते. सदर अपघात कशामुळे झाला याची माहिती अद्याप स्पष्ट झाली नाही.

अपघाताची माहिती मिळताच महामार्गाचे संदिप चटलेवार, महेश कात्रे आणि मदतनीस वसंत शिनगारे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. नरेंद्राचार्य संस्थान रुग्णवाहिकेचे चालक राजू पाचंगे, १०८ रुग्णवाहिकेचे डॉ. आनंद शिंदे आणि मारोती गिरी यांनी जखमींना कारमधून बाहेर काढून तातडीने रुग्णालयात हलवण्यासाठी मदत केली. तर रस्त्यावर ऑइल सांडले असता दुसरा अपघात होणार नाही यासाठी त्यावर माती टाकून रस्ता साफ करून घेतला यावेळी जरार आहमद, सलिम माणिकपेठे, धनराज पुरी,हानुमंत बोईनवाड, दिपक लिंगायत, महेश हाळीकर, जहीरोद्दीन फारुखी आदींनी मदतकार्य केले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# महापौरपदी गाडे तर उपमहापौरपदी जाधव होणार विराजमान




**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर महापालिकेत भाजप राष्ट्रवादी काँग्रेस युतीने महापौर व उपमहापौर पदांसाठी उमेदवार निश्चित केले. महापौरपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्योती अमोल गाडे तर उपमहापौरपदासाठी भाजपचे धनंजय कृष्णा जाधव यांना उमेदवारी अर्ज भरण्याच्या सूचना देण्यात आल्या. यासंदर्भात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आ. संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत नगरसेवकांची बैठक पार पडली. बैठकीत युतीची रणनीती, संख्याबळ आणि निवडणूक प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

युतीच्या या निर्णयामुळे महापालिकेतील सत्तासमीकरण स्पष्ट झाले असून, आगामी महापौर निवडणुकीत युतीचा विजय निश्चित मानला जात आहे.

शहर विकास, नागरी सुविधा आणि प्रशासकीय स्थैर्याला प्राधान्य देत समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सरनाईक मोरवाजी भांगरे (मोरवाजी बाबा) यांचा एक ज्वलंत इतिहास

सह्याद्रीच्या पर्वत रांगेत असलेल्या अकोले तालुक्यातील महाकाळाच्या पायथ्याशी असलेले आमचे आराध्य दैवत सरनाईक मोखाजी बाबा यांचा हा इतिहास आहे.मावळभागाची जबाबदारी सरनाईक मोखाजी भांगरे यांच्याकडे होती.मोखाजी भांगरे हे मावळात असलेल्या अनेक नाईकांचे सरनाईक होते.व आपला राज्यकारभार चालवत होते.मोखाजी भांगरे हे पराक्रमी शूरवीर लढवय्ये होते त्यांची महादेवावर अपार श्रध्दा होती.ते आपल्या घोड्यासहित महाकाळ डोंगराच्या गडदीत फनशीची पाटी येथे रहात होते. त्या गडदीमध्ये राहण्याची सोय होती.मधून घोड्याचा आवाज आला की लोकांना कळत असे मोखाजी भांगरे आत आहेत.एखादे बाहेरून नविन कोणी गावात आले की त्यांना मोखाजी भांगरे यांची परवानगी घ्यावी लागत असे. त्यांचं आपल्या जनतेवर खूप प्रेम होतं.एकेकाळी भयंकर दुष्काळ पडला होता.मावळात जनतेवर उपासमारीची वेळ आली होती.अशा वेळेस बिदर बादशहाने जनतेकडून कर वसुलीचे फर्मान सोडले होते.मग मोखाजी भांगरे यांनी आपले साथिदार नाईक देशमुख,नाईक खतेले व इतर नाईकांना बोलावून बैठक घेतली. त्या बैठकीत ठरले की, दुष्काळामुळे शेतात काही पिकले नाही माणसं उपाशीपोटी राहत आहेत.त्यामुळे बादशहाला कर देता येणार नाही.ठरल्या प्रमाणे मोखाजी भांगरे यांनी बादशहाला कळविले.परंतु बादशहाने आपल्या सैनिकांमार्फत बळजबरीने कर वसुली सुरू केली लोकांना आस देऊ लागले.कर न दिल्यामुळे जनतेचा छळ करायला लागले.अशा वेळी मात्र मोखाजी भांगरे यांनी आपल्या जनतेची बाजू घेऊन बादशहाच्या विरोधात गेले व बादशहाच्या सैन्याबरोबर लढाई केली त्यात बादशहाच्या सैन्याची हार झाली.जनतेला आनंद झाला लोक मोखाजी भांगरे यांचं गुणगान गावू लागले.तिकडे बिदर बादशहा खवळला. त्याने मोठी फौज घेऊन मावळ भागावर चालून आला. तो लोकांचा छळ करू लागला,सांगा मोखाजी भांगरे कुठं आहे असं लोकांना विचारू लागला. पण लोकं काही सांगत नव्हते त्यामुळे चिडून लोकांना त्रास देऊ लागला. आणि शोधत शोधत तो महाकाळ डोंगराच्या पायथ्याशी आला तेथे बादशहाचा घोडा ओरडू लागला. मग मोखाजी भांगरे यांच्या घोड्याने गडदीतून ओरडणे सुरू केले.मग बादशहा मनी आनंदला त्याने सैनिकांना मोखाजी भांगरे यांना कैद करण्यास सांगितले.कैद होत असताना मोखाजी भांगरे यांनी बादशहाला ठणकावून सांगितले की, मी माझं प्राण असे पर्यंत जनतेकडून कर वसूली होऊन देणार नाही, जनतेला उपाशी राहुन देणार नाही कैद केल्यामुळे मावळी जनता हळहळली जनतेचा आक्रोश झाला.बादशहाने मोखाजी भांगरे यांना कैद करून बिदरला नेण्यात आले व तिथे त्यांना कारागृहात ठेवण्यात आले.बादशहाला बेगम नावाची



एक सुंदर मुलगी होती.ती हुशार व कर्तबगार होती.पराक्रमी शूरवीर सरनाईक मोखाजी भांगरे यांचं मावळी जनतेवरील प्रेम पाहून व त्यांचा पराक्रम पाहून ती त्यांच्यावर मोहित झाली.तिने आपल्या वडिलांना सांगितले की,मी मोखाजी भांगरे यांना मनापासुन पती मानले आहे मला त्यांच्याशी लगिन करायचे आहे. बादशहाने तिला नकार दिला पण मुलीच्या हट्टापुढे त्याचे काही चालले नाही मग बादशहाने आपल्या सल्लागाराला विचारून एक अट ठेवली. त्यांनी एक लांब खड्डा खोदला आणि सांगितले की,या खड्यावरून मोखाजी भांगरे यांनी जर घोडा उडविला तर तुझं लगिन मोखाजी भांगरे सोबत लावलं जाईल व त्यांना सोडून देण्यात येईल.असं बादशहाने आपल्या मुलीला सांगितले.मग मोखाजी भांगरे व बादशहाची मुलगी बेगम यांच्यात बोलणं झाले आणि मोखाजी भांगरे तयार झाले. त्यांनी आपला घोडा त्या खड्यावरून उडविला ते पाहून बादशहा आवाक झाला.कारण तो खड्डा असा बनविण्यात आला होता की त्या खड्यावरून कोणाचाच घोडा उडवण्यात येऊ नये मग बादशहापूढे प्रश्न पडला आता काय करायचे त्याने सल्लागाराला विचारून एक युक्ती केली त्यांनी मोखाजी भांगरे यांना सांगितले की,भर सभेसमोर कड्यावरून घोडा उडवायचा.आणि त्याची सर्व तयारी करण्यात आली.सल्लागाराच्या सल्ल्यानूसार मोखाजी भांगरे यांना मारण्याचा डाव आखला गेला.कारण मोखाजीना सोडलं तर आपलं राज्य त्याच्या ताब्यात जाईल.त्या कड्यावरून घोडा उडविण्या अगोदर त्याच्यामध्ये भाले तलवारी सहित सैन्य बसविण्यात आले.त्याची खबर मोखाजी भांगरे आणि बादशहाची मुलगी बेगम यांना नव्हती. पण मोखाजींचा बादशहावर भरोसा नव्हता.त्यामुळे त्यांनी बादशहाची मुलगी बेगमला सांगितले की,तू जर खरोखर मला पती मानत असशील तर माझ्याशी काही दगा फटका झाला तर माझ्या गावी माझ्या मावळी जनतेला कळव.तिने ते मान्य केले. सभेसमोर कड्यावरून घोडा उडविण्याचा दिवस उगवला सभा भरली बादशहाची मुलगी बेगम बादशहा सहित सर्व उपस्थित झाले.मोखाजी भांगरे घोडा उडविण्यासाठी सज्ज झाले.बादशहाचा हुकूम मिळताच मोखाजी भांगरे यांनी खड्यावरून घोडा उडवला अन तिथेच घात झाला खड्ड्यात लपलेल्या सैनिकांनी भाले घोड्याला खुपसले लगेच घोड्यासहित मोखाजी भांगरे खड्डयात कोसळले मग त्या सैनिकांनी त्यांचं शीर (मुंडके) उडविले.ते भयानक दुष्य पाहून बादशहाची मुलगी बेगम जमिनीवर कोसळली.तिने आक्रोश केला बादशहाला सांगितले तुम्ही माझ्याशी धोका केला माझ्या मानलेल्या पतीला तुम्ही मारले मला तुमच्या पाशी राहण्याचा अधिकार तुम्ही ठेवला नाही.तिने मोखाजी भांगरेंचं शीर त्यांच्या एकदरे या गावी नेण्याचा निश्चय केला पण तिला रस्ता माहित नव्हता मग बादशहाने बेगममाई सोबत सैनिक दिले. तीने ते शीर घेऊन विचारीत विचारीत काही दिवसांनी औंढा-पट्टा येथे आली तेथिल लोकांना म्हणाली मोखाजी भांगरे यांनी सांगितले होते की आडव्या डोंगरा खाली माझं गाव आहे.लोकांनी सांगितले की, महाकाळाच्या डोंगराखाली एकदरे गाव आहे असं म्हणून लोक तिच्या बरोबर एकदरे गावी आले आल्यावर मोखाजी भांगरेंची खबर सा-या मावळ मुलखात पोहोचली. सारी मावळी जनता गोळा झाली.आजही मोखाजी भांगरेंच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी गावकरी यात्रा भरवितात.

**– बाजिराव भांगरे (संकलन एकदरे)**

# पावणे गाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**नवी मुंबई : (समर्थ गांवकरी)**



नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ३३, पावणे गाव येथे विविध कला गुणदर्शन समारंभ व "महाराष्ट्राची लोकधारा" या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देत सामाजिक प्रबोधनाचाही महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी अभंग, पोवाडा, भारुड, ज्ञानेश्वरीतील ओव्या यांसह पारंपरिक लोककलेचे सादरीकरण केले. तसेच पाणी बचत, पर्यावरण संवर्धन, निसर्गाचे रक्षण कसे करावे याबाबत जनजागृतीपर नाटिका व गीतांच्या माध्यमातून प्रभावी संदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पावणे गावाचे नगरसेवक शशिकांत भोईर, समाजसेवक विनोद खराटकर, डॉ. सांगळे, तसेच शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी दैनिक समर्थ गावकरीच्या २०२६ च्या दिनदर्शिकेचे व विशेष अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. सांस्कृतिक परंपरा जपत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवा निर्माण करणारा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.



नांदेड जिल्हा : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भांडारपाल व्यंकट गोविंदराव नागरगोजे हे विद्यापीठाच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय सेवेनंतर दि. ३१ जानेवारी, २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सेवापूर्ती (निरोप) समारंभ विद्यापीठाच्या अधीसभा सभागृहात संपन्न झाला. या कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सत्कारमूर्ती व्यंकट नागरगोजे व त्यांची पत्नी सौ. आशा नागरगोजे हे व्यासपीठावर उपस्थित होते. आपल्या मनोगतात मान्यवरांनी नागरगोजे यांच्या कार्यकाळाचा गौरव करताना, त्यांनी विद्यापीठातील भांडार विभागाची जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे, शिस्तबद्ध व पारदर्शक पद्धतीने पार पाडल्याचे नमूद केले.

## थोडक्यात बातम्या...



### ओतूर जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने मतदार जनजागृती अभियान

**ओतूर (स. गांवकरी) :** आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदानाची टक्केवारी वाढावी व नागरिकांमध्ये लोकशाही विषयी जागरूकता निर्माण व्हावी या उद्देशाने ओतूर ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने १ फेब्रुवारी रोजी प्रभात फेरी काढून मतदान जनजागृती अभियान राबवण्यात आले. ओतूर शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आलेल्या भव्य रॅलीतून " मतदान करा,लोकशाही बळकट करा " "एक मत, मजबूत भारत ", मतदान हे आपले कर्तव्य ",मतदान हे सर्वश्रेष्ठ दान,मतदान राजा जागा हो, अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. लोकशाही व्यवस्थेत मतदान हा केवळ हक्क नसून जबाबदारी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. या उपक्रमात ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष रामदास डुंबरे, उपाध्यक्ष दत्तात्रय डुंबरे,किसन फापाळे,कार्याध्यक्ष मा.ल. जाधव,माजी अध्यक्ष महादेव ओतूरकर,सचिव बबन डुंबरे, कोषाध्यक्ष पांडुरंग अहिनवे,आत्माराम खराडे,सूर्यकांत फापाळे,संचालक भि. स. माळवे,विलास सुतार,अशोक सहाणे,रामदास ढमाले,एकनाथ डुंबरे,कांचन थोरात, दिलीप घोलप,दत्तात्रय ठिकेकर,सल्लागार सुदाम ढमाले,देविदास तांबे,वसंत डुंबरे, जी. आर. डुंबरे,माधवराव डुंबरे ,प्रदीप शहा, बबन नलावडे,अनाजी फापाळे ,सबाजी ढमाले, नंदु भोर तसेच निवडणूक निर्णय अधिकारी स्वप्निल मोरे,निवडणूक नोडल अधिकारी विष्णू धोंगडे,कैलास नागरगोजे, अर्चना चिमटे आदींसह अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### 'अजितदादां'चा अस्थीकलशाचे नांदेड करणांनी घेतले दर्शन

**नांदेड (स. गांवकरी) :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे आज दुपारी नांदेडमध्ये आगमन झाले आहे. दि २ फेब्रुवारी रोजी अजितदादांच्या अस्थी कलशाचे दर्शन घेण्यासाठी दुपारी ४ वाजल्यापासून आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर, नांदेड येथील जनसंपर्क कार्यालयात ठेवण्यात आला आहे. तरी उद्या मंगळवार, दि.३ फेब्रुवारी रोजी सकाळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे संपर्क कार्यालय, वसंतनगर, नांदेड येथून असती कलश यात्रा सकाळी ८ वाजता निघणार आहे. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या सर्व जनतेने अस्थिकलशाचे दर्शन घ्यावे,असे आवाहन जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोठे बु. गावच्या यात्रेला गालगोट

- **माहिती अधिकारात अर्ज केला म्हणून सरपंचाने युवकाला केली बेदम मारहाण.!**

**(समर्थ गांवकरी)**

माहिती अधिकार कायदा, २००५ हा भारत सरकारचा एक महत्त्वपूर्ण कायदा आहे. जो १२ ऑक्टोबर २००५ पासून पूर्णपणे लागू झाला आहे.या कायद्यान्वये देशातील नागरिकांना सरकारी विभागांकडून माहिती मिळवण्याचा व कागदपत्रांची तपासणी करण्याचा आणि त्यांच्या प्रमाणित प्रती घेण्याचा अधिकार मिळतो.ज्यामुळे प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी वाढते. परंतु यापूर्वी माहिती अधिकारात माहिती मागणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांचे खून झाले.गंभीर स्वरूपाचे हल्ले झाल्याच्या देखील घटना यापूर्वी घडलेल्या आहे.

अशाच प्रकारची एक घटना संगमनेर तालुक्यातील पठार भागातील कोठे बुद्रुक गावात घडली आहे.पठार भागातील कोठे बु.गावातील श्री.खंडेरायाची पहिलीच यात्रा भरली जाते.मात्र या यात्रेला मुंबईहून आलेल्या ग्रामस्थ तरुणाने यापूर्वी ग्रामपंचायतीकडे माहिती अधिकारात अर्ज करत केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा मागविला होता.या कारणातून गावचे सरपंच व त्यांचे भाऊ यांचेकडून या तरुणास बेदम मारहाण करत गावचे यात्रा उत्सवाला गालबोट लावल्याची खळबळजनक घटना रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजून ३० मिनिटांच्या सुमारास घडली आहे.

कोठे बु.गावातील तरुण संदेश हौशीराम डोफे नोकरी व्यवसाय निमित्ताने मुंबई येथे वास्तव्यास आहे.सन २०२५ मध्ये डिसेंबर महिन्यात गावातील विकास कामांसंदर्भात ग्रामपंचायत कोठे बु.यांना माहिती अधिकारात अर्ज केला गेला होता.परंतु ग्रामपंचायतने उडवाउडवीचे उत्तर देत माहिती देण्यास टाळाटाळ केली गेली असून नागरिकांच्या अधिकाराची पायमल्ली केली गेली आहे. गावचे ग्रामदैवताची यात्रा असल्याने सदर तरुण श्री. खंडेरायाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गेला.दर्शन घेऊन मंदिराच्या पायऱ्यां उतरत असताना गावचे सरपंच आशिष शिवाजी वाकळे व त्याचा भाऊ आकाश शिवाजी वाकळे यांनी तु माहीती अधिकाराचा अर्ज देतो. तुला माज आला आहे. आज उतरवतो असे म्हणत तर शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी



देण्यात आली आहे.या मारहाणीत तरुणाचे अंगावरील कपडे फाडले. तर त्यात त्यांचे मोबाईलचे नुकसान झाले असून गळ्यातील सोन्याची चैन गहाळ झाली आहे. गावच्या सरपंचाने यात्रेत विन्घ आणल्याने व हा सर्व मारहानीचा प्रकार ग्रामदैवत मंदीराच्या समोर झाल्याने गावात सरपंचाने दहशतीचे वातावरण निर्माण केल्याने गावातील सर्वांच्याच भुवया उंचावल्या गेल्या आहेत. याप्रकरणी संदेश डोफे यांच्या जीवितास धोका असून सरपंच आशिष शिवाजी वाकळे व आकाश शिवाजी वाकळे यांचेविरुद्ध घारगाव पोलिसांत तक्रार नोंदविली असून या घटनेचा पुढील तपास घारगाव पोलिस करत आहे.

# मूलभूत सुविधांबाबत किनवट वकील संघ-नगराध्यक्षा चर्चा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट येथे मंजूर झालेल्या व सध्या निर्माणाधीन असलेल्या जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीच्या ठिकाणी आवश्यक त्या मूलभूत व नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने किनवट वकील संघाकडून पुढाकार घेण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर नवनियुक्त नगराध्यक्षा सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांचा वकील संघाच्या वतीने सत्कार करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्या संदर्भात किनवट वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नगर परिषद कार्यालयात नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान जिल्हा व सत्र न्यायालयाच्या इमारतीभोवती रस्ते, पिण्याच्या पाण्याची सुविधा, वीजपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, ड्रेनेज, पार्किंग सुविधा तसेच न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यक असलेल्या इतर नागरी सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे असल्याचे वकील संघाच्या वतीने नमूद करण्यात आले. न्यायालय सुरू झाल्यानंतर न्यायाधीश, वकील, कर्मचारी तसेच न्यायासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना कोणत्याही अडचणीचा सामना करावा लागू नये, यासाठी नगर परिषद व प्रशासनाने समन्वयाने काम करावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार यांनी वकील संघाच्या सूचनांचे स्वागत करत, जिल्हा व सत्र न्यायालय हे किनवट शहरासाठी अत्यंत महत्त्वाचे शासकीय केंद्र ठरणार असल्याचे सांगितले.

# स्व अजितदादांनी निलेश लंकेंना संधी दिली : सभापती किसनराव रासकर

- **पारनेर बाजार समितीमध्ये स्वर्गीय अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ शोकसभेचे आयोजन**
- **खासदार निलेश लंके यांची प्रमुख उपस्थिती**



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पवार कुटुंबामुळे पारनेर तालुक्याला लाल दिवा मिळाला परंतु सर्वसामान्य कुटुंबातील निलेश लंके या सामान्य व्यक्तीला विधानसभा निवडणुकीत स्वर्गीय अजितदादा पवार यांनीच उमेदवारी देऊन आमदार केले व पुढे पवार साहेबांनी डोक्यावर हात ठेवत खासदार केले त्यामुळे पवार कुटुंबाचे योगदान निलेश लंके साहेबांच्या जीवनात मोठे आहे. अजित पवार आपल्यातून निघून गेल्यामुळे सर्वात जास्त दुःख खासदार निलेश लंके यांना झाले हे आपण सर्वांनी पाहिले स्वर्गीय अजित पवार गेले ही दुर्दैवी अशी घटना असून असे घडायला नको होते असे मत पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ज्येष्ठ नेते किसनराव रासकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात बारामती येथे दुःखद निधन झाले यामुळे संपूर्ण महाराष्ट्र हळहळला नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांना या घटनेचा मोठा धक्का बसला. पारनेर येथे अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ खासदार निलेश लंके यांच्या प्रमुख उपस्थितीत पारनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने शोकसभा आयोजित करण्यात आली होती. रविवार दि. 1 फेब्रुवारी 2026 रोजी पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारामध्ये ही शोकसभा आयोजित करण्यात आली. या शोकसभेला पारनेर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभापती किसनराव रासकर पुढे बोलताना म्हणाले पवार कुटुंबाचे आपल्या तालुक्यावर मोठे योगदान आहे स्व. आमदार वसंतराव झावरे पाटील व स्व. ज्येष्ठ नेते माऊली पठारे यांच्यापासून 1980 सालापासून पवार कुटुंबाशी जोडलो गेलो आहे. त्यांचाच वसा व वारसा जोडून यामुळे मला पारनेर तालुक्यात राजकारण करत असताना विविध पदे मिळाली यामध्ये जिल्हा स्तरावर पक्ष कार्यकारणीत मिळालेली पदे तसेच तालुक्यात पंचायत समिती निवडणुकीत मिळालेली संधी व आत्ता खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून पारनेर बाजार समितीत सभापती पदावर मिळालेली संधी ही खऱ्या अर्थाने पवार कुटुंबाच्या आशीर्वादामुळे मिळाली आहे. पारनेर तालुक्याच्या व पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी स्व. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे योगदान राहिले आहे. पारनेर बाजार समितीच्या उद्घाटनाला स्वतः अजित पवार पारनेरला आले होते ही आठवण आजही ताजी आहे. त्यांच्याच मार्गदर्शनामुळे पारनेर बाजारपेठ ही आज एका वेगळ्या उंचीवर पोहोचली आहे हे सर्व योगदान पवार कुटुंबाला आहे व खासदार निलेश लंके यांना आहे. शोकसभेसाठी उपस्थित शेतकरी वर्गाच्या चेहऱ्यावर अजितदादा गेल्याची दुःखद भावना दिसून येत होती. उपस्थित प्रत्येक जण हळूहळू व्यक्त करत होता खासदार निलेश लंके यांच्या चेहऱ्यावर सुद्धा दुःख दिसून येत होते. यावेळी माजी सभापती गंगाराम बेलकर बोलताना म्हणाले की स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पारनेर तालुक्याच्या विकासामध्ये मोठे योगदान असून या तालुक्याच्या जडणघडणीमध्ये त्यांचा वाटा आहे.

स्वर्गीय अजितदादा पवार यांचे योगदान माझ्या जीवनात फार मोठे आहे. त्यांच्या विचारांवर मी राजकारण व समाजकारण करत आहे त्यांच्यामुळेच मला पक्षाचा दोन वेळा तालुकाध्यक्ष होण्याची संधी मिळाली तसेच पारनेर बाजार समितीमध्ये सभापती पदावर काम करण्याची संधी मिळाली अजित पवार यांचा सारखा सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला न्याय देणारा नेता पुन्हा होणे नाही त्यांची आठवण चिरंतर राहील.

**- बाबासाहेब तरटे (तालुकाध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष)**

स्वर्गीय अजितदादा पवार हे वेळेचा आदर करणारा प्रसन्न नेता होता त्यांचे आपल्या पारनेर तालुक्यावर खूप मोठे उपकार आहेत ते कधीही न विसरण्यासारखे आहेत अजितदादांनी सर्वसामान्य चेहरा पारनेर तालुक्यात निवडला आणि निलेश लंके सारख्या माणसाला आमदार केले खरोखर दादांचे हे आपल्यावर खूप मोठे उपकार आहेत अजित पवार गेले सर्व सामान्य जनतेला खूप मोठे दुःख झाले खरंतर पुरोगामी विचारसरणीचा नेता जाती धर्म न मानणारा नेता आपल्यातून गेला राजकारण करत असताना शेतकऱ्याचाच विचार केला खऱ्या अर्थाने अजितदादांच्या रूपाने ग्रामीण भागातील नेतृत्व आपल्यातून हरपले. **- अर्जुन भालेकर (जिल्हा उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)**

# अजित दादांसारखा शिस्तप्रिय व कामाचा माणूस गेला : आमदार काशिनाथ दाते

## महाराष्ट्राची भरून न निघणारी हानी झाली; पारनेर येथे शोकसभा व अस्थीकलशाची शहरातून मिरवणूक : अजितदादा अमर रहे..अमर रहेच्या घोषणा




**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

स्व. अजितदादा पवार यांचे समाजासाठी मोठे योगदान राहिले असून पारनेरला त्यांनी नेहमीच विकासासाचे झुकते माप दिले. स्वच्छतेला अतिशय महत्त्व देणारा नेता म्हणून ते परिचित होते. शिस्तप्रिय आणि कामाचा माणूस म्हणून त्यांची ओळख होती. बारामतीला त्यांनी शिक्षणाची माहेरघर उभे केले त्या ठिकाणची शैक्षणिक संस्थेच्या इमारत या दादांच्या कामाची साक्ष देतात. पारनेरच्या विकासात पवार कुटुंबाचे मोठे योगदान आहे सुप्याची एमआयडीसी त्यांच्या योगदानामुळेच निर्माण झाली अजितदादा आपल्यात नसले तरी त्यांचे विचार हे आपल्यात आहेत त्यांचे विचार पुढे नेण्यासाठी यापुढील काळात आपण सर्वांनी मिळून काम केले पाहिजे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरणार आहे. दोन्हीही राष्ट्रवादी एकत्र होण्यासाठी दोन्हीही पक्षांचे नेते एकत्र बसतील ते ठरवतील सध्या केवळ अफवा आहेत चांगला पक्ष आपल्याला उभा करायचा आहे असे मत पारनेर नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केले पारनेर येथे स्वर्गीय अजित पवार यांच्या स्मृती प्रित्यर्थ पारनेर जिल्हा बँकेच्या सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन आमदार काशिनाथ दाते, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, पारनेर तहसीलदार गायत्री सौंदणे, जी. एस महानगर बँक अध्यक्षा गीतांजली शेळके, सुमनताई दाते, जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड, भाजप नेते विश्वनाथ कोरडे, भाजप तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, माजी नगराध्यक्ष विजय औटी, शिवसेना (उबाठा) तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी अहिल्यानगर राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी दादांचा अस्थिकलश पारनेर येथे आणला रविवारी सायंकाळी हा असती कलश पिंपळनेर येथे आणण्यात आला व त्यानंतर तो पारनेर शहरात सोमवारी सकाळी दहा वाजता दर्शनासाठी ठेवण्यात आला होता.

यावेळी पारनेर शहरातून स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या अस्थिकलशाचे मिरवणूक काढण्यात आली व त्यांना विनम्र अभिवादन आले. या शोक सभेमध्ये व मिरवणुकीत पारनेर तालुक्यातील सर्व राजकीय पक्षांतील व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते सर्वपक्षीय नेते महिला भगिनी प्रशासनातील अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

पारनेर येथे आयोजित शोक सभेला यावेळी पारनेर नगरसेवक युवराज पठारे, युवा नेते दिलीप दाते, पारनेर दूध संघाचे अध्यक्ष संदीप ठुबे, पारनेर खरेदी विक्री संघाचे चेअरमन दत्तात्रय रोकडे, रिपाइं तालुकाध्यक्ष राजेंद्र उबाळे, माजी सभापती गणेश शेळके, माजी जि. प. सदस्य वसंत चेडे, ॲड. युवराज पाटील, उद्योजक धनंजय निमसे, विकास रोकडे, अमोल रोकडे, ॲड. पांडुरंग गायकवाड, माजी सरपंच संजीवनी आंधळे, राष्ट्रवादी नेते पंढरीनाथ उंडे, सरपंच मनोज मुंगसे, सरपंच संजय काळे, सरपंच डॉ.विलास काळे, इंद्रभान गाडेकर, सागर मैड, नगरसेवक अशोक चेडे, कांतीलाल ठाणगे, दत्तानाना पवार, सरपंच लहू भालेकर, माजी सरपंच बाळासाहेब रेपाळे, शेतकरी नेते अनिल देठे, जयसिंग कर्डिले, साहेबराव वाफारे, महिला तालुकाध्यक्षा सुषमा रावडे, युवती तालुकाध्यक्ष अपर्णा खामकर सुधामती कवाद, कविता औटी, सोनाली सालके, जयश्री शिंदे, बाबासाहेब नऱ्हे, जेष्ठ नेते अरुण घनवट, अजिंक्यतारा दरेकर, सुभाष दुधाडे, आदी सर्वपक्षीय नेते यावेळी उपस्थित होते.

स्व. अजितदादा हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी काम करणारा नेता होता त्यामुळे महाराष्ट्र पोरका झाला त्यांच्यासारखा आक्रमकपणे काम करणारा नेता गेल्यामुळे जनता दुःखात आहे. जनतेच्या प्रश्नांची जाण असलेले नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले हे मोठे दुःख आहे.

**- डॉ. श्रीकांत पठारे ( तालुकाध्यक्ष : शिवसेना (उबाठा), पारनेर)**

अजितदादांच्या जाण्याने ही मोठी धक्कादाय घटना आहे. राज्यात नवे तर देशात हळळ व्यक्त होत आहे. कामाचा अवका असणारा नेता गेला जनतेच्या कामासाठी झटणारे व भल्या पहाटे कामाची सुरुवात करणारे तळागाळातील जनतेची जाण असणारे कामाचे सूक्ष्म नियोजन व लक्ष देणारे नेतृत्व आपल्यातून गेले हे मोठे दुःख आहे. कामाला लागा एकजुटीने राहा ही शिकवण अजितदादा पवार यांनी नेहमीच दिली. गुलाबराव शेळके साहेब व उदयदादा शेळके व अजित दादांचे सबंध हे खूप प्रेमाचे होते. **- गीतांजली शेळके (अध्यक्षा, जी.एस. महानगर बँक)**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून गेले ४२ वर्ष मी सहकारी म्हणून काम केले व पारनेर तालुक्याच्या विकास कामांच्या बाबतीत नेहमीच त्यांच्याकडून सल्ला घेतला. संघटनात्मक पातळीवर काम करत असताना नेहमीच त्यांच्याशी माझा संबंध राहिला व सलोख्याचे संबंध निर्माण झाले अजितदादा पावर साहेब आपल्यातून गेल्यामुळे खूप मोठी हानी झाली आहे. **-अशोकराव सावंत (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अहिल्यानगर)**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)